ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २३ डिसेंबर, १९५९ | अंक ४७

## विविध माहिती

**कृत्रिम रबराचा कारखाना**—दक्षिण आफ्रिकेच्या इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें द. आफ्रिकेंत कृत्रिम रबर उत्पादन करण्याची शक्यता अजमावण्याचें ठरविलें आहे. ह्या बाबतींतील तपासणी उत्तेजक वाटल्यास कृत्रिम रबर निर्माण करण्यासाठी एक स्वतंत्र कंपनीच स्थापन करण्यांत येईल. रबराच्या खपाबाबत द. आफ्रिकेचा जगांत ९ वा अनुक्रम लागतो.

**जागतिक शेतीप्रदर्शन**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या जागतिक शेतीप्रदर्शनाची माहिती करून घेण्यासाठी पाकिस्तानचें एक प्रतिनिधि-मंडळ पुढील महिन्याच्या अखेरीस भारतांत येणार आहे. प्रतिनिधिमंडळांत सामान्य शेतकरी आणि शेतीविषयक तज्ज्ञ ह्यांचा समावेश करण्यांत येणार आहे. आधुनिक पद्धतीच्या शेतीची अद्यावत् माहिती करून घेण्याचा मंडळाचा उद्देश आहे.

**अफगाणिस्थान-रशिआ करार**—अफगाणिस्थान आणि रशिआ ह्यांच्यांत लष्करी दृष्टीनें महत्त्वाचा असा एक रस्ता बांधण्याचा करार करण्यांत आला आहे. ह्या रस्त्यानें कंदाहार शहर रशिआच्या दक्षिणेकडील सरहद्दीवरील एका शहराला जोडलें जाईल. रस्ता बांधणीचें सर्व काम रशिआ करणार असून मालमसालाहि तोच पुरविणार आहे.

**पं. नेहरूंनीं दुभाषाचें काम केलें**—अमेरिकेचे अध्यक्ष आयसेनहोअर ताजमहाल पहाण्यास गेले असतां एक पाथरवट संगमरवरी दगडावर नक्षीकाम करतांना त्यांना दिसला. त्यांनीं लगेच त्याच्या कामासंबंधीं चौकशी केली. संगमरवरावर नक्षी कोरण्याच्या कसबाची माहिती त्यानें प्रे. आयसेनहोअर ह्यांना दिली. ह्या प्रसंगीं पं. नेहरूंनीं दुभाषाचें काम केलें.

**निःशस्त्रीकरणासाठीं साह्य**—ब्रिटनच्या पार्लमेंटमधील एक मजूर सभासद मि. फिलिप नोएल बेकर ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं शांतताकार्याबद्दल १५,२१९ पौंडाचें नोबेल पारितोषक मिळविलें. निशस्त्रीकरणाच्या प्रचाराला मदत म्हणून ह्या पारितोषकांपैकी १२,००० पौंड देण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. निःशस्त्रीकरणाचा प्रचार करणाऱ्या आणखी एका आंतरराष्ट्रीय संस्थेला ते २,००० पौंड वेगळे देणार आहेत.

**साडी नेसण्याचे प्रांतिक प्रकार**—प्रे. आयसेनहोअर ह्यांच्या दिल्लीच्या भेटीच्या वेळीं ५० हिंदी व परदेशी स्त्रियांनीं त्यांच्या सुनेची भेट घेतली. ह्यावेळीं हिंदी स्त्रियांना आपआपल्या प्रांताच्या रीतीस अनुसरून साड्या नेसण्यास सांगण्यांत आलें होतें. साडी नेसण्याच्या निरनिराळ्या पद्धतींची माहिती मिसेस बारबरा आयसेनहोअर ह्यांना करून देण्यांत आली. त्यावेळीं त्यांनीं बरीच आस्था दाखविली.

**मृत व्यक्तीच्या सन्मानार्थ भोजनास बंदी**—राजस्थानच्या विधिमंडळानें मृताच्या सन्मानार्थ भोजन घालण्याची जी पद्धत शेंकडों वर्षें राज्यांत चालत आली आहे, तीवर बंदी घातली आहे. मृत व्यक्तीचे नातेवाईक, पुजारी आणि फकीर ह्यांना मात्र भोजन देतां येईल. पण, त्यांचीहि संख्या १०० च्यावर असतां कामा नये. भोजन देणारा व भोजन घेणारा दोघेंहि गुन्हेगार ठरविण्यांत आले आहेत.

**मरहूम जिना ह्यांचें स्मारक**—पाकिस्तानचे संस्थापक मरहूम जिना ह्यांचें स्मारक म्हणून त्यांच्या थडग्यावर एक भव्य इमारत बांधण्यांत येणार आहे. इमारतीसाठी ३० एकर जमीन ताब्यांत घेण्यांत आली आहे. स्मारकाची इमारत ८० फूट लांब व ८० फूट रुंद होईल. इमारतीभोंवतीं एक सुंदर बगीचा तयार करण्यांत येणार आहे.

**हैद्राबाद येथें विमानाचा कारखाना**—हैद्राबाद येथें विमानें बनविण्याचा एक कारखाना काढण्यासाठी भारत सरकार एका अमेरिकन विमान कंपनीशीं वाटाघाटी करीत आहे. इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशन वहातुकीच्या विमानासाठी डकोटा विमानें वापरीत आहे. संकल्पित कारखान्यांत मुख्यतः वहातुकीचीं विमानें तयार करण्यांत येतील.

**वन्य जमातींची वसाहत**—मध्यप्रदेश सरकारनें चालू आर्थिक वर्षांत वन्य जमातीच्या ३०० कुटुंबांची वसाहत स्थापन करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक कुटुंबाला प्राथमिक खर्चासाठी म्हणून ५०० रुपये देण्यांत येतील. त्याशिवाय बैल आणि शेतीचीं अवजारें विकत घेण्यासाठी आणखी ५०० रुपयांची मदत देण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा रिझल्ट

नाशिक येथे ता. २१-१०-५९ रोजी झालेल्या सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासच्या परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे लागला आहे. परीक्षेस एकूण ५३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी दुसऱ्या वर्गात ७ व तिसऱ्या वर्गात ३२ मिळून एकंदर ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. क्लासचा रिझल्ट ७५ टक्के लागला आहे.

द्वितीय श्रेणी:—(१) तुकाराम दोधू जाधव, (२) विठोबा हनुमंता जाधव, (३) अनंत लक्ष्मीदास कपूर, (४) लक्ष्मण मुरलीधर संदारे (५) बाळनाथ रसमाजी कुशारे, (६) नरहर शंकर माळी, (७) हरि वासुदेव शेजवळ.

तृतीय श्रेणी:—(१) नामदेव केदा आहेर, (२) लक्ष्मण सदाशिव आवटे, (३) शंकर सखाराम बसो, (४) शिवाजी माधवराव मालेराव, (५) दामोदर महादेव भरवीरकर, (६) केशव शंकर बोरसे, (७) चतुरभुज नारायण, दाधीज, (८) गोविंद शंकर देशमुख, (९) साहेबराव नामदेवराव देशमुख, (१०) राजाराम सुकदेव हरकळ, (११) कारभारी रामचंद्र इंगळे, (१२) बंडू दगडू जाधव, (१३) गंगाधर बबन कळमकर, (१४) प्रेमा विठोबा खालकर, (१५) सुरेश राजाराम कोळमकर, (१६) भास्कर भाऊराव कोतवाल, (१७) वसंत देविदास लकडे, (१८) शिवाजी रामकृष्ण निखाडे, (१९) धर्मा कोंडाजी ओतारी, (२०) नामदेव घोंडिराम पगार, (२१) राजाराम शिवाजी पाटील, (२२) महेंद्र बाळासाहेब पवार, (२३) अनंत सखाराम पुजारी, (२४) नाथबुवा गणपत रोकडे, (२५) लक्ष्मण बळवंत ठाकरे, (२६) कारभारी गोविंद थेटे, (२७) पोपट गंगाराम वाढवणे, (२८) अंबादास शंकर वाघ, (२९) श्रीपत भागूजी वाघ, (३०) निंबा शंकर वाणी, (३१) बाजीराव भिकाजी झोमन, (३२) भिवसन काळू जाधव.

## नव्या गुजरात राज्याच्या कचेऱ्या

१९५६ साली निर्माण करण्यांत आलेल्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे विभाजन करून महाराष्ट्र व गुजरात अशी दोन वेगळीं राज्यें निर्माण करण्याचें आतां निश्चित झालें आहे; व त्यादृष्टीनें सरकारी हालचाली सुरू झाल्या आहेत. गुजरात राज्याची नवीन राजधानी तयार नाहीं, तोंपर्यंत त्याला आपल्या राज्याच्या कचेऱ्या अहमदाबाद शहरांतच थाटाव्या लागणार आहेत. अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलच्या नव्या इमारतींतील एका पांच मजली भागांत गुजरात राज्याची मुख्य कचेरी उघडण्यांत येईल असें समजतें. ही इमारत १.२५ कोटी रु. खर्चून बांधण्यांत आली असून तींत नव्या राज्याची मुख्य कचेरी आणि विधानसभा सामावूं शकतील. एकूण सुमारें ९०,००० चौरस फूट जागा सरकारला ह्या इमारतींत मिळूं शकेल. त्याशिवाय १९६० मध्यें पुरी होणारी पॉलिटेकनिकची इमारतहि सरकार आपल्या कांहीं कचेऱ्यांसाठी ताब्यांत घेणार आहे. ह्या इमारतीसाठी २२ लाख रु. खर्च होतील. अहमदाबादमध्यें बहुतेक सर्व खात्यांच्या कचेऱ्या खोलण्यांत येणार असल्या तरी सरकारी खात्यांपैकी कांहींच्या मुख्य कचेऱ्या बडोदा व राजकोट येथें ठेवण्यांत येण्याचा संभव आहे. १९६० च्या मार्चमध्यें सुमारें २,००० नोकर मुंबईहून अहमदाबादला बदलून जातील. अहमदाबादमध्यें सध्यां सरकार रिकाम्या जागा कायद्यानें आपल्या ताब्यांत घेत नाहीं. पण अहमदाबाद व बडोदा ह्या दोन शहरांत तरी रहात्या जागांचा ताबा घेण्यासाठीं पुन्हा कायद्याचा आधार घेण्यांत येईल.

## कापड गिरण्यांना पुरेसा प्रमाणांत कापूस मिळेल

अलिकडील कांहीं आठवड्यांत कापसाचे भाव अति वाढत आहेत. एकतर देशांत कापसाचे पीक कमी येईल असा अंदाज केल्यानें व दुसरें म्हणजे आयातीसाठी ठरवून देण्यांत येणारा कापसाचा एकूण सांठा कापड गिरण्यांची गरज भागविण्यासाठी पुरेसा पडणार नाहीं या समजुतीनें या किंमती वाढत असाव्यात असें दिसतें. सरकार या परिस्थितीकडे अत्यंत बारकाईनें लक्ष देत आहे. कांहीं काळानें याबाबतची परिस्थिति स्पष्ट झाल्यानंतर देशांत कापसाचें पीक किती येईल याची स्पष्ट कल्पना येईल. परंतु दरम्यानच्या काळांत, कापसाच्या तुटीमुळें कापड उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊं नये यासाठी पुरेशी व्यवस्था करण्यांत येईल अशी खात्री या धंद्यास सरकार देऊं इच्छितें असें मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्याच्या प्रसिद्धी पत्रकांत म्हटलें आहे.

## "साखरेवरील नियंत्रण उठवा; उत्पादन वाढवून दाखवूं"

"साखरेच्या किंमतीवरील नियंत्रणें दूर करावींत, म्हणजे साखर कारखानदार शेतकऱ्यांना ज्यास्त किंमत देऊं शकतील. त्यामुळें कारखान्यांकडे अधिक ऊंस गळितासाठी येऊन साखरेचें उत्पादन वाढेल. साखरेची किंमत प्रत्येक मणामागें कांहीं रुपयांनीं वाढेल हें खरें आहे; पण गिऱ्हाइकाला आज काळ्या बाजारांत जी किंमत द्यावी लागते, त्यापेक्षा ती कमीच असेल." अशा आशयाचें पत्र इंडियन शुगर मिल्स असोसिएशननें भारत सरकारला पाठविलें असून त्याचा विचार सरकार करीत आहे.

## मॅनेजिंग एजंटांना आडमार्गानें कर्ज

मॅनेजिंग एजंटस किंवा त्यांचे संबंधित लोक ह्यांच्या मालकीच्या जागा भाड्यानें घेऊन त्या भाड्याचे पोटीं मोठाल्या रकमा आगाऊ देण्याची व त्या दीर्घ मुदतींत वळते करून घेण्याची प्रथा कांहीं कंपन्यांनीं सुरू केली आहे. एका वर्षापेक्षा ज्यास्त मुदतीचें अगाऊ भाडें सहसा कोणी देत-घेत नाहीं; तेव्हां मॅनेजिंग एजंटांना मोठ्या रकमा वापरण्यास देण्याचाच हा प्रकार होतो; आणि तो अनिष्ट आहे. 'इंटर-कंपनी लोन्स' सदरांतहि तो कांहीं बाबतींत बसूं शकेल. तेव्हां ते प्रकार बंद करावेत, असें मध्यवर्ती सरकारनें सुचविलें आहे.

## इं. मो. फंडाकडील कर्ज घेण्याची जरूरी नाहीं

सुएझ कालवा प्रकरणीं हस्तक्षेप करतेवेळीं ग्रेट ब्रिटननें इंटर नॅशनल मोनेटरी फंडाकडून कर्ज मिळविलें होतें, त्यापैकी ७४ कोटी डॉलर्सचें मंजूर कर्ज ग्रेटब्रिटननें अद्याप उचललेलें नाहीं. ३१ डिसेंबर, १९५९ रोजीं त्याची मुदत संपते. पण तीं वाढवून घेण्याची ब्रिटिश सरकारला आवश्यकता वाटत नाहीं. कारण, त्या देशाच्या परराष्ट्रीय देण्या-घेण्याची परिस्थिति सुधारली आहे.

## हिंदी आर्थिक परिषद

वरील परिषदेचें ४२ वें अधिवेशन अन्नमलाइनगर येथें ३० व ३१ डिसेंबर, १९५९ आणि १ जानेवारी, १९६० रोजीं भरणार आहे. प्लॅनिंग कमिशनचे आर्थिक सल्लागार, प्रा. जे. जे. अंजारिया हे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

# अर्थ

बुधवार, ता. २३ डिसेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मागासलेल्या देशांना अधिक मदत देण्याची जरूरी

परदेशांत दौरे करून भारताला आर्थिक मदत मिळविण्याची शक्यता अजमावण्याचें काम भारताचे कमिशनर-जनरल फॉर इकॉनॉमिक्स अफेअर्स श्री. बी. के. नेहरू हे करीत असतात. अमेरिकेंतील इन्स्टिट्यूट ऑफ फॉरिन एड ह्या संस्थेपुढें बोलतांना श्री. नेहरू ह्यांनीं अमेरिकेकडून परदेशांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीविषयीं आपले विचार व्यक्त केले आहेत. श्री. नेहरू म्हणाले कीं अमेरिकेनें परदेशांना देण्यांत येत असलेल्या आर्थिक मदतींत वाढ केली पाहिजे आणि जगांतील गरीब व श्रीमंत देशांत जी विषमता दिसत आहे ती कमी केली पाहिजे. आज औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले देश आणि अपुरा विकास झालेले देश ह्यांच्यांतील अंतर वाढतच चाललें आहे. ही परिस्थिति नैतिक दृष्ट्या असमर्थनीय व सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अतिशय धोक्याची आहे; इतकेंच नव्हे तर आर्थिक दृष्ट्या ती श्रीमंत देश व गरीब देश ह्या दोघांच्याहि दृष्टीनें अहितकारक आहे. ह्या वर्षी अमेरिकेनें परदेशांना मदत करण्यासाठी ३२० कोटी डॉलर्स खर्च केले; पण एवढ्या मोठ्या रकमेपैकी बहुतेक सर्व रक्कम प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या लष्करी साह्यासाठी खर्च करण्यांत आली. अवघी ८० कोटी डॉलर्सची रक्कम परदेशांतील आर्थिक विकासाचीं कामें पार पाडण्यासाठी खर्च करण्यांत येत आहे. उत्तर अमेरिका, युरोप व ऑस्ट्रेलिआ ह्या भूभागांतून दारिद्र्याचें जवळ जवळ उच्चाटन करण्यांत आलेलें आहे. ही कामगिरी गेल्या शतकांत पार पाडण्यांत आली. ही प्रगति हाय ह्यांत शंकाच नाहीं. पण, आशिआ, आफ्रिका व दक्षिण अमेरिका ह्यांमधील कोट्यवधि लोकांना प्रगतीचा फारच थोडा फायदा झाला, हेंहि तितकेंच खरें आहे.

देशांदेशांमधील आर्थिक परिस्थितींत जी तफावत दिसून येते ती कमी करण्यांत येत नाहीं. ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे; उलट ती वाढतच चालली आहे. हा प्रकार ह्यापुढेंहि असाच चालू राहिला तर जगांत सध्यां जी विभागणी झालेली दिसते ती आहे त्यापेक्षांहि अधिक तीव्र होईल. त्याचा परिणाम असा होईल कीं जगाचा एक छोटासा भाग विलासांत आणि सुखसोयींत लोळत राहील, आणि बाकीच्या जगांत दारिद्र्य व दुःख ह्यांचें साम्राज्य नांदूं लागेल. ह्या भागांतील लोकांना पुरेसें खायला मिळणार नाहीं, राहायला निवाऱ्याची जागा मिळणार नाहीं, पुरेसें वस्त्र मिळणार नाहीं, शिक्षण मिळणार नाहीं किंवा वैद्यकीय मदत मिळणार नाहीं. म्हणून विभागणीची ही प्रक्रिया थांबविण्यांत आली पाहिजे. लोकशाही पद्धतीनें आणि सामाजिक समतेच्या पद्धतीनें ह्या परिस्थितींत बदल घडवून आणावयाचा असेल, तर मागासलेल्या देशांना खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत देण्याशिवाय दुसरा मार्गच उपलब्ध नाहीं. परिस्थिति सुधारण्यास मार्ग नाहीं असें नाहीं. जे देश औद्योगिक दृष्ट्या प्रगत झालेले आहेत त्यांनीं आपल्या साधन-सामुग्रीपैकीं बराच मोठा भाग मागासलेल्या देशांच्या विकासासाठी लावून देणें एवढाच एक मार्ग शिल्लक आहे. ह्या धोरणामुळें श्रीमंत लोकांना कांहींसा त्याग करावा लागेल ही गोष्ट खरी आहे. पण हा त्याग फारसा मोठा नाहीं. त्यांच्याजवळ असलेल्या संपत्तीमधून त्यांनीं कांहीं द्यावयाचें आहे असें नाहीं. त्यांच्याजवळ असलेल्या संपत्तीच्या साह्यानें त्यांना दरसाल सहजगत्या अधिक संपत्तीचा लाभ होत असतो. ह्या अधिक निर्माण होत असलेल्या संपत्तीपैकी अल्पसा भाग त्यांनीं अविकसित देशांच्या आर्थिक प्रगतीसाठी द्यावयाचा आहे. त्यांनीं इतकें जरी केलें तरी सध्याच्या परिस्थितींत सुधारणा होण्यास चांगला प्रारंभ होईल.

## मध्यप्रदेश राज्यांतील मागासलेली वहातूक व्यवस्था

मध्यप्रदेश सरकारपुढें जे अनेक प्रश्न उभे आहेत त्यांत वहातुकीच्या व दळणवळणाच्या साधनांची कमतरता हा एक प्रमुख प्रश्न आहे. सध्यांच्या मध्यप्रदेशांत पूर्वीच्या अनेक लहान-मोठ्या संस्थानांच्या प्रदेशाचा समावेश करण्यांत आलेला आहे. त्यामुळें संस्थानांच्या मागासलेपणाचा वारसा त्याला स्वीकारावा लागला आहे. संस्थानी प्रदेशांत वहातुकीच्या व दळणवळणाच्या साधनांचा विकास बेताचाच झालेला होता. मध्यप्रदेशाची औद्योगिक, शेतीविषयक आणि कारभारविषयक प्रगति घडून येण्यासाठी रस्त्यांचें मोठें जाळेंच निर्माण करावें लागेल आणि हें काम फारच द्रुतगतीनें करावें लागणार आहे. राज्यांतील बऱ्याच भागांत जंगलनिवासी आदिवासी रहातात. त्यांना आधुनिक सुधारणेच्या कक्षेंत आणण्यासाठी दळणवळणाचीं साधनेंहि वाढविलीं जाणे आवश्यक आहे. १९५६ सालीं नवा मध्यप्रदेश निर्माण करण्यांत आला त्यावेळीं दोन अगर अधिक राज्यांना जोडणारे मोठे रस्ते फारच कमी होते. राज्याच्या सरहद्दीवर नद्या पार करण्यासाठी पूल नव्हते. पूल बांधणें हें काम खर्चाचें होतें आणि त्यासाठी एखादी मध्यवर्ती संघटनाहि अस्तित्वांत नव्हती. नव्या राज्याचा प्रदेश वेडावाकडा असा आहे. त्यामुळें रस्त्यांची कमतरता अधिकच जाणवते. भोपाळ ही नव्या राज्याची राजधानी आहे. पण, खुद्द भोपाळला जाण्यासाठी राज्याच्या निरनिराळ्या भागांतून येणारे सोयीचे व जवळचे रस्ते नाहींत. रस्त्यांप्रमाणेंच रेल्वेमार्गांच्या लांबीच्या बाबतींत आणि जलवहातुकीच्या बाबतींतहि मध्यप्रदेश मागासलेलें राज्य आहे. भारताच्या मध्यवर्ती बसलेल्या ह्या प्रदेशाचा औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी रस्त्यांची फार निकड आहे.

## म्हैसूर किर्लोस्कर लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९५९ अखेर संपलेल्या वर्षी ११० लक्ष रुपयांची विक्री केली; त्यापूर्वीच्या वर्षी ती ८९ लक्ष रु. ची होती. ऑर्डिनरी भागांवर १२% डिव्हिडंड मिळणार आहे; गेल्या वर्षी तें ७½% होतें. अहवालाचे वर्षी कंपनीनें १५ लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी भाग दर्शनी किंमतीस विक्रीस काढले, ते सर्व खपले.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

### गेल्या तीन वर्षांतील कामकाज

| | ३०-६-१९५७ अखेरच्या वर्षी | | ३०-६-१९५८ अखेरच्या वर्षी | | ३०-६-१९५९ अखेरच्या वर्षी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम (हजार रु.) | संख्या | रक्कम (हजार रु.) | संख्या | रक्कम (हजार रु.) |
| १. आलेले अर्ज | ६७ | २१,२६,२५ | ४८ | १४,८८,५० | २६ | ११,१६,५७ |
| २. मंजूर केलेले अर्ज | ५१ | ११,९०,७५ | २२ | ७,७८,५० | १९ | ३,७९,०० |
| ३. दिलेलीं कर्जें | — | ९,७७,५० | — | ८,३३,३५ | — | ७,४७,७१ |
| ४. नामंजूर अर्ज | १४ | ४,८७,५० | १ | १०,०० | ३ | ३१,५० |
| ५. परत घेतलेले किंवा रद्द झालेले अर्ज | १० | २,७३,१० | १० | २,११,५० | २२ | ९,७९,५० |
| ६. विचार चालू असलेले अर्ज | २६ | ११,१७,०० | ४१ | १४,९८,४० | २३ | ११,७०,९७ |

### गेल्या ११ वर्षांत मंजूर केलेलीं व दिलेलीं कर्जें

| अखेरच्या रकमा | मंजूर केलेलीं कर्जें रु. | प्रत्यक्ष दिलेलीं कर्जें रु. |
|---|---|---|
| ३० जून १९४९ | ३,४२,२५,००० | १,३२,८९,८१३ |
| ३० ,, १९५० | ७,१९,२५,००० | ३,४०,७४,३१२ |
| ३० ,, १९५१ | ९,५८,२०,००० | ५,७८,६५,८०० |
| ३० ,, १९५२ | १४,०३,४५,००० | ७,५७,०३,८०० |
| ३० ,, १९५३ | १५,४६,७०,००० | १०,०६,७९,८०० |
| ३० ,, १९५४ | २०,७३,७५,००० | १२,८८,६५,७५२ |
| ३० ,, १९५५ | २८,०७,७५,००० | १४,५२,९६,३०४ |
| ३० ,, १९५६ | ४३,२०,७५,००० | १६,७३,१९,६७७ |
| ३० ,, १९५७ | ५५,११,५०,००० | २६,५०,७०,१७४ |
| ३० ,, १९५८ | ६२,९०,००,००० | ३४,४८,०५,१४८ |
| ३० ,, १९५९ | ६६,६९,००,००० | ४२,३१,७६,१५५ |

### ठोक उत्पन्न आणि व्यवस्था खर्च

| ३० जून अखेर | ठोक उत्पन्न (लक्ष रु.) | व्यवस्था खर्चाचें ठोक उत्पन्नाशीं प्रमाण % |
|---|---|---|
| १९४९ | ५·०३ | ५०·०९ |
| १९५० | २३·४७ | २०·३७ |
| १९५१ | ३५·८७ | १४·०२ |
| १९५२ | ४२·०५ | १३·५६ |
| १९५३ | ४९·३० | १३·७१ |
| १९५४ | ५४·७४ | १३·४६ |
| १९५५ | ६०·७१ | १५·६५ |
| १९५६ | ६७·६३ | ११·७४ |
| १९५७ | ९६·३३ | ९·४५ |
| १९५८ | १५४·९१ | ६·३२ |
| १९५९ | २०३·८८ | ५·११ |

### भागांची वांटणी

| | | | |
|---|---|---|---|
| मध्यवर्ती सरकार | ... | ... | २,००० |
| रिझर्व्ह बँक | ... | ... | २,०५४ |
| शेडयूल्ड बँका | ... | ... | २,४०५ |
| विमा कंपन्या | ... | ... | २,५९६ |
| सहकारी बँका | ... | ... | ९४५ |
| | | | १०,००० |

### मंजूर कर्जांची उद्योगधंद्यावार वर्गवारी

| उद्योगधंद्याचा प्रकार | ३०-६-५८ अखेर मंजुरी रु. | ३०-६-५९ मधील मंजुरी रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| टेक्स्टाईल मशिनरी | ८३,००,००० | — | ८३,००,००० |
| मॅकॅनिकल इंजिनिअरिंग | २,०८,००,००० | २०,००,००० | २,२८,००,००० |
| इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | १,७५,७०,००० | ६,००,००० | १,८१,७०,००० |
| कॉटन टेक्स्टाइल्स | ८,७२,७५,००० | ६५,००,००० | ९,३७,७५,००० |
| वूलन टेक्स्ट.इल्स | ३५,००,००० | — | ३५,००,००० |
| रेयॉन | १,१०,००,००० | — | १,१०,००,००० |
| केमिकल्स | ८,५३,२५,००० | — | ८,५३,२५,००० |
| सिमेंट | ५,०७,००,००० | १,१०,००,००० | ६,१७,००,००० |
| सिरॅमिक्स, ग्लास | १,९१,७५,००० | — | १,९१,७५,००० |
| ऑइल मिल्स | ११,००,००० | — | ११,००,००० |
| वीज | ८२,७५,००० | — | ८२,७५,००० |
| मेटॅलर्जिकल | ४५,५०,००० | — | ४५,५०,००० |
| लोखंड-पोलाद | २,२७,५०,००० | ३३,००,००० | २,६०,५०,००० |
| अल्युमिनिअम | ५०,००,००० | — | ५०,००,००० |
| साखर | १९,१७,००,००० | १,४५,००,००० | २०,६२,००,००० |
| खाणी | ३७,००,००० | — | ३७,००,००० |
| कागद | ५,७१,५०,००० | — | ५,७१,५० ००० |
| मोटारी, ट्रॅक्टर | १,६४,५०,००० | — | १,६४,५०,००० |
| प्लायवुड | ३०,००,००० | — | ३०,००,००० |
| इतर | १,१६,८०,००० | — | १,१६,८०,००० |
| | ६२,९०,००,००० | ३,७९,००,००० | ६६,६९,००,००० |

**फ्रेंच तेल कंपनीला कर्ज**—सहारा वाळवंटांतील तेलाच्या खाणींतून तेल उपसणाऱ्या एका फ्रेंच कंपनीला जागतिक बँकेकडून ५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून फ्रेंच कंपनी तेलाच्या विहिरींपासून अल्जीरिआच्या किनाऱ्यावरील बंदरापर्यंत तेलवहातुकीचे नळ घालण्याचें काम पूर्ण करणार आहे. सहारांत तेलाचा आढळ झाल्यामुळें प. युरोपला तेल लवकरच मिळूं शकेल.

**बोइंग ७०७ विमान**—एअर इंडिआ इंटरनॅशनलचें पहिलें ७०७ बोइंग विमान १९६० च्या फेब्रुआरींत भारतांत येईल. ह्या विमानामुळें भारताच्या वैमानिक वहातुकींत एक नवें पर्व सुरू होईल. मुंबई ते लंडन हा ५,००० मैलांचा प्रवास हें विमान न थांबवतां करूं शकेल. प्रवास पूर्ण होण्यास ९ तास लागतील.

**दुर्गापूर एंजिनिअरिंग कॉलेज**—पश्चिम बंगालमध्यें दुर्गापूर येथें एक एंजिनिअरिंग कॉलेज लवकरच स्थापन करण्यांत येणार आहे. कॉलेजच्या स्थापनेसाठी १·५ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार असून ही रक्कम मध्यवर्ती सरकारनें मंजूर केली आहे. नवीन कॉलेज लवकरच काढण्यांत येणाऱ्या बरद्वान विद्यापीठाला जोडण्यांत येईल.

## कोणतीं शेतीचीं अवजारें जप्तींतून मुक्त आहेत ?

### सधन आणि आधुनिक साधनें वापरणाऱ्या शेतकऱ्याला सवलत मिळणार नाहीं.

### मध्यप्रदेश हायकोर्टाचा महत्त्वाचा निवाडा

कन्हैय्यालाल या इसमानें मथ्राबाई आणि गणेशराम यांचेविरुद्ध डिक्री मिळविली आणि त्या डिक्रीच्या अंमलबजावणींत निर्णीत ऋणकोच्या मालकीचें एक ऑईल इंजिन, त्याचे सुटे भाग, पाणी काढण्याचा पंप आणि एक रबराची नळी या वस्तूंवर जप्ति आणली. या जप्तीला निर्णीत ऋणकोनीं विरोध केला. आपण शेतकरी असून वर दिलेल्या वस्तू शेतकीची साधनें असल्यामुळें सिव्हिल प्रोसिजर कोड, क. ६० (१) अपवाद (ब) खालीं त्या वस्तू जप्तीपासून मुक्त आहेत असें त्यांचें म्हणणें होतें. अंमलबजावणी कोर्टानें त्यांची ही हरकत फेटाळून लावली. ऑईल एंजिन पिठाची चक्की चालविण्याकरितां उपयोगांत आणली जात होती आणि विहीर कायमची आटून गेल्यामुळें पाण्याचा पंप जवळ जवळ १८ महिने निकामी पडला होता आणि म्हणून या वस्तूंना शेतकीचीं अवजारें म्हणतां येणार नाहीं असें अंमलबजावणी कोर्टाचें म्हणणें होतें. या निकालावर मथ्राबाईनें हायकोर्टांत अपील केलें.

हायकोर्टापुढें एकच प्रश्न होता. तो असा कीं, ऑईल इंजिन, त्याचे सुटे भाग आणि पाण्याचा पंप यांना सिव्हिल प्रोसिजर कोड, क. ६० (१), अपवाद (ब) खालीं जप्तीपासून मुक्तता मिळविण्याकरितां शेतीचीं अवजारें म्हणतां येईल काय ? प्रस्तुत मामल्यांत जप्तीच्या वेळेस ऑईल एंजिन पिठाची चक्की चालविण्याकडे वापरलें जात असून पंप ज्या विहिरीला बसविला होता ती विहीर कायमची आटल्यामुळें पंप निकामी होऊन पडला होता. ज्याअर्थी अशा प्रकारें वरील वस्तू शेतकीच्या कामासाठी वापरल्या जात नव्हत्या त्याअर्थी त्या वस्तूंना शेतकीचीं अवजारें म्हणतां येणार नाहीं आणि म्हणून त्या वस्तू जप्तीपासून मुक्त नाहींत. ऑईल एंजिन सुरुवातीला पिठाची चक्की चालविण्याकरितां आणि विहिरींतून पंपानें पाणी काढण्याकरितां वापरलें जात होतें हें निर्णीत ऋणकोचें म्हणणें जरी मान्य केलें तरी ऑईल एंजिन आणि त्याच्या सुट्या भागांना शेतकीचीं अवजारें म्हणतां येणार नाहीं.

सिव्हिल प्रोसिजर कोड, क. ६० (१), अपवाद (ब) खालीं शेतकीचीं अवजारें जप्तीपासून मुक्त आहेत. ही व्यवस्था गरीब शेतकऱ्याच्या फायद्याकरितां केलेली आहे. यांतील तत्त्व असें आहे कीं, शेतीच्या धंद्याला अतिशय आवश्यक असणारीं साधनें गरजू आणि गरीब शेतकऱ्यांपासून हिरावून घेतलीं जाऊं नयेत. तीं साधनें शेतकऱ्यांच्या उपजीविकेला आवश्यक असलीं पाहिजेत. विहिरींतून पाणी पंपानें काढण्याकरितां लावलेलें ऑईल एंजिन शेतीला अगदीं आवश्यक आहे असें म्हणतां येणार नाहीं. त्यावांचून शेतकऱ्याचें अडत नाहीं. दुसऱ्या साधनांनींहि विहिरींतील पाणी काढतां येतें. ऑईल एंजिनसारखीं यांत्रिक साधनें वापरून शेतीला सुलभतेनें आणि लवकर पाणी देतां येतें हें जरी खरें असलें तरी ऑईल एंजिनला अत्यावश्यक म्हणतां येणार नाहीं.

शालीग्राम वि. शिवप्रताप (१९३८ नागपूर लॉ जर्नल ४१६) या नागपूर हायकोर्टाच्या निवाड्यांत प्रश्न असा होता कीं, मोटार ट्रॅक्टर हें शेतीचें अवजार आहे काय ? नागपूर हायकोर्टानें असा निकाल दिला कीं, मोटार ट्रॅक्टर हा ऑईल एंजिनचाच एक प्रकार असून बैलाऐवजीं जरी तो वापरला जात असला तरी शेतीला तो अत्यावश्यक नाहीं आणि म्हणून मोटार ट्रॅक्टरला शेतीचें साधन म्हणतां येणार नाहीं.

शेतीच्या कामाला आजच्या युगांत वापरण्यांत येत असलेल्या यांत्रिक साधनांना जर सिव्हिल प्रोसिजर कोड, क. ६० (१), अपवाद (ब) खालीं शेतकीचीं अवजारें समजण्यांत आलें तर एखाद्या सधन माणसाला आधुनिक यांत्रिक साधनें वापरून शेतीचा धंदा करतां येईल आणि हीं यांत्रिक साधनें जप्तीपासून मुक्त आहेत असें त्याला म्हणतां येईल. अशा सधन आणि आधुनिक यांत्रिक साधनें वापरणाऱ्या शेतकऱ्याच्या फायद्याकरितां क. ६० (१) अपवाद (ब) केलेलें नाहीं.

तेव्हां ऑईल एंजिन, विहिरींतून पाणी काढणारा पंप आणि त्यांचे सुटे भाग हे शेतीचीं अवजारें नाहींत आणि म्हणून क. ६० खालीं जप्तीपासून ते मुक्त नाहींत असा निकाल देऊन हायकोर्टानें अपील नामंजूर केलें.

### सारांश

सिव्हिल प्रोसिजर कोड, क. ६० (१), अपवाद (ब) खालीं शेतकीचीं अवजारें हीं जप्तीपासून मुक्त आहेत. हें कलम गरीब शेतकऱ्यांच्या फायद्याकरितां केलेलें आहे. त्याचा उद्देश असा आहे कीं, शेतीला अत्यावश्यक असणारीं अवजारें त्यांच्यापासून हिरावून घेतलीं जाऊं नयेत. शेतकऱ्यांच्या उपजीविकेला जीं साधनें अत्यावश्यक आहेत तींच जप्तीपासून मुक्त आहेत. सधन शेतकरी वापरीत असलेलीं आधुनिक यांत्रिक साधनें जप्तीपासून मुक्त नाहींत. ऑईल एंजिन वापरून शेतीला सुलभतेनें आणि कमी वेळांत पाणी देतां येतें ही गोष्ट जरी खरी असली तरी ऑईल एंजिन हें शेतीला अत्यावश्यक नाहीं. त्याच्यावांचून शेतकऱ्याचें अडून बसत नाहीं. असें असल्यामुळें ऑईल एंजिन, विहिरींतून पाणी काढणारा पंप आणि त्याचे सुटे भाग ह्यांना शेतीचीं अवजारें समजतां येणार नाहींत आणि म्हणून त्या वस्तू जप्तीपासून मुक्त नाहींत.

(न्याय बोध, डिसें. १९५९).

---

### यु. नेशन्स स्पेशल फंडांतून मदत

युनायटेड नेशन्स स्पेशल फंडाच्या गव्हर्निंग कौन्सिलनें ३५ देशांतील ३१ कामांसाठी २,३७,१०,९१० डॉलर्सची मदत मंजूर केली आहे. भारताला सर्वांत जास्त, म्हणजे ३०,१२,८०० डॉलर्स मिळणार आहेत. दुर्गापूर (प. बंगाल) येथें मेकॅनिकल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापण्यासाठी ७,०७,६०० डॉलर्स मिळतील; बंगलोर येथें पॉवर इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट काढण्यासाठी १९,५३,८०० डॉलर्स उपलब्ध होतील आणि कलकत्ता, मद्रास व कानपूर येथें प्रादेशिक लेबर इन्स्टिट्यूटसाठी ३,५१,४०० डॉलर्स मिळतील.

---

### हिमालयावर नवी स्वारी

एव्हरेस्ट विजेता, सर एडमंड हिलरी, हा हिमालयावर शास्त्रीय स्वारीसाठी १९६० चे अखेरीस निघणार आहे. लवकरच तो नेपाळला जाऊन येथील अधिकाऱ्यांशीं ह्या स्वारीच्या तपशिलाविषयीं चर्चा करणार आहे. ह्या नव्या स्वारींतील गिर्यारोहक २७,००० फूट उंचीपर्यंत ऑक्सिजनचा उपयोग न करतां चढून जाणार आहेत.

## भारतांतील संरक्षण कारखान्यांची प्रगति

स्वातंत्र्याच्या बाराव्या वर्षांत संरक्षण खात्याच्या कामकाजाच्या सर्व क्षेत्रांत बरीच प्रगति झाली आहे; त्यांतल्या त्यांत या खात्यांच्या शास्त्रीय संशोधन व उत्पादन विभागांच्या प्रगतीचा वेग विशेष प्रशंसनीय आहे. संरक्षण कारखान्यांत व त्यांशीं संबंध असलेल्या उद्योगधंद्यांस या वर्षांत, आपल्या देशाच्या विस्तीर्ण किनारपट्टीचें व सरहद्दीचें संरक्षण करण्यासाठी लागणारीं हरतऱ्हेचीं शस्त्रें व दारूगोळा आणि इतर साहित्य, विमानें, ट्रक, ट्रॅक्टर इत्यादींचें मोठ्या प्रमाणांत उत्पादन करतां आलें.

संरक्षण उत्पादन क्षेत्राच्या शास्त्रीय पायावरील सर्वांगीण विकासास याच वर्षी प्रारंभ होऊन यामुळें आपलीं सैन्यदलें अधिक बलवान्, कार्यक्षम आणि स्वावलंबी होऊं लागलीं. त्याचप्रमाणें संरक्षण उद्योगधंद्यांनीं इतर राष्ट्रीय क्षेत्रांसाठीहि महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. दारूगोळा कारखान्यांनीं आपल्याकडील जादा उत्पादनशक्तीचा इतर प्रकारच्या मालाच्या उत्पादनासाठीं उपयोग केला.

संरक्षण उत्पादन वाढविण्यासाठी योजिलेल्या या उपायांमुळें आपल्या आयातींत मोठ्या प्रमाणावर घट होऊन परकीय हुंडणावळीची बचत झाली; इतकेंच नव्हे तर संरक्षण खात्यावरील खर्चात् चालू वर्षांत एकूण सुमारें ३५ कोटी रुपयांची बचत करणेंहि शक्य झालें आहे.

अलीकडील काळांत विज्ञान व तंत्रविद्येंत झालेल्या आश्चर्यकारक प्रगतीमुळेंच अधिक प्रभावी शस्त्रें निर्माण करणें शक्य झालें आहे आणि म्हणून संरक्षण गरजांचें बदलतें स्वरूप लक्षांत घेतां तसेंच संरक्षणासाठी लागणाऱ्या साहित्य-निर्मितींत स्वावलंबी होण्यासाठी संरक्षणविषयक संशोधन व विकासाचा वेग सतत प्रयत्न करून क्रमशः वाढविण्यांत आला आहे.

नवीन क्षेत्रांतील संशोधनासाठीं संरक्षण-प्रयोगशाळांची एक साखळीच निर्माण करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें शस्त्रास्त्रें, इलेक्ट्रॉनिक्स, विमानविद्या व धातुशोधन या क्षेत्रांतील नव्या गरजा भागविण्यासाठी चालू प्रयोगशाळांतील सोयींत वाढ करण्यांत येत आहे.

### दारूगोळा कारखाने

सैन्यदलांच्या वाढत्या गरजा भागवितांना दारूगोळा कारखान्यांस अनेक अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. उपलब्ध आर्थिक साधनांनुसार या कारखान्यांचें टप्प्याटप्प्यानें आधुनिकीकरण व विकास चालू आहे. या कार्यक्रमामुळें सैन्यदलांत आतापर्यंत आयात करावी लागणारी सामग्री देशांतच तयार करणें शक्य झालें आहे. संरक्षणासाठी लागणाऱ्या, कपडालत्ता, यांत्रिक व रासायनिक माल, पोलाद व इतर धातूंपासून बनविलेल्या वस्तु, कातडी माल आणि इतर हरतऱ्हेच्या वस्तूंच्या बाबतींत आपण आतां ९५ टक्के स्वावलंबी झालों आहोंत.

गेल्या दोन वर्षांत १२ प्रकारचा दारूगोळा, पायरोटेक्निक्सचे सहा प्रकार, ६ प्रकारचीं शस्त्रें व इतर मालाचें देशांत उत्पादन होऊं लागलें आहे. त्याशिवाय रणगाडाविरोधी शस्त्रें, नागरी कामांसाठी वापरण्यांत येणारीं शस्त्रें व दारूगोळा, मोटराइज्ड ग्राइंडर्स, हायड्रॉलिक सरफेस ग्राइंडर्स, प्रिसिजन व टूल-रूम लेथ्स आणि अंबरनाथ येथील मशिन टूल प्रोटोटाइप फॅक्टरींत तयार झालेली कॅप्स्टन लेथ्स इ. वस्तूहि आतां या कारखान्यांत तयार होऊं लागल्या आहेत. या कारखान्यांत सध्या प्रतिवर्षी ५० लाख रु. किंमतीची मशीन टूल्स तयार होत असतात. या कारखान्यांत नागरी कामांसाठी लागणाऱ्या वस्तू तयार करतांना आतापर्यंत यांपैकी फक्त आयात केल्या जाणाऱ्या वस्तच तयार करण्याची खबरदारी घेण्यांत येते. त्याचप्रमाणें या कारखान्यांतून एका जपानी फर्मच्या सहकार्यानें ट्रॅक्टर्सचें व एका जर्मन फर्मच्या सहकार्यानें ट्रक्सचहि उत्पादन होत असतें.

ट्रॅक्टर्सचा विचार करतां त्यांत लागणाऱ्या मुख्य स्प्रिंग्ज धरून ट्रॅक्टर्सचे सुटे भाग यापूर्वीच तयार होऊं लागले आहेत. दंडकारण्य योजनेसाठी १६ ट्रॅक्टर्स, तयार करण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें राजस्थान कालवा योजनेसाठी ट्रॅक्टर्स पुरविण्याच्या विनंतीचाहि विचार होत आहे. परदेशी तंत्रज्ञांच्या सल्ल्यानें मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टर्सचें उत्पादन करण्याचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणें पार पाडण्यांत येत असून १९६० च्या सुरुवातीला सुमारें १२०० ट्रॅक्टर्स तयार होण्याचा अंदाज आहे.

दारूगोळा कारखान्यांतून लष्करी कामांसाठी लागणाऱ्या ट्रक्सचें उत्पादन हा एक प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा होय. जबलपूर येथील गनकॅरेज फॅक्टरींत लष्करी कामांसाठी लागणारे ट्रक्स तयार करण्याच्या योजनेचें उद्घाटन करतांना पंतप्रधान श्री. नेहरू यांनीं शक्तिमान् हा तीन टनी लष्करी ट्रक म्हणजे औद्योगिक युगांत विश्वासानें पाऊल टाकण्याच्या भारतीय जनतेच्या निर्धाराचें प्रतीकच होय असें घोषित केलें होतें. आर्थिक व लष्करी स्वावलंबनाच्या मार्गावर टाकण्यांत आलेलें तें आणखी एक पाऊल होय असेंहि ते म्हणाले होते.

### विमानांचें उत्पादन

भारतांत विमानाचें पहिलें इंजिन यंदाच्या मार्चमध्यें तयार करण्यांत आलें. हें ९० अश्वशक्तीचें एअर कूल्ड, चार सिलेण्डरचें इंजिनाहि अवघ्या साडेचार महिन्यांत तयार करण्याचें श्रेय बंगलूर येथील हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट (प्रायव्हेट) लि. नेंच मिळविलें. या विमानास लागणारे ९५ टक्के भाग देशांतच बनविण्यांत आलेले आहेत. सदर कंपनीनें दोन जणांची बसण्याची सोय असलेलें अतिशय हलकें 'पुष्पक' विमानहि तयार केलें. त्यास मान्यता लाभली असून त्याचें व्यापारी प्रमाणावर उत्पादन होऊं लागलें आहे. इंग्लंडमधील कारखानदारांकडून घेतलेल्या परवान्याखाली विमानदलासाठी ग्नॅट जेट लढाऊ विमान तयार करण्याच्या दृष्टीनेंहि गेल्या वर्षांत प्रारंभ झालेला आहे.

विमानदलाच्या कानपूर येथील मेण्टेनन्स कमांडच्या बेस रिपेअर डेपोवरील अेरोनॉटिकल डेव्हलपमेंट सेण्टरनें या वर्षाच्या प्रारंभीं चार जणांस बसतां येईल असें विविधोपयोगी विमान तयार केलें. तसेंच युद्धकाळांतील ऑटोकार सोडवून त्यांची पुनर्बांधणी करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी आवडी येथें विमानदलाच्या तंत्रज्ञांनी केली. त्याबद्दल सर्वत्रांकडून त्यांची प्रशंसा करण्यांत आली. आवडी येथे दरमहा सरासरी दहा ऑटोकार तयार होऊन बाहेर पडतील.

भारत सरकारनें अलिकडेच डाकोटाऐवजीं ए-व्ही-आर-ओ-७४८ या जातीचीं विमानें कानपूर येथें तयार करण्यासाठी एका ब्रिटिश फर्मशीं करार केला आहे.

### इलेक्ट्रॉनिक सामग्री

बंगलूर येथील भारत इलेक्ट्रॉनिक्स (प्रायव्हेट) लि. चें सदर वर्षांतील स्पृहणीय यश म्हटलें म्हणजे विमानदलासाठी अंतरिक्षांतून भूमावर दळणवळण जोडण्याकरितां द्विमार्गी व्ही.

च. एफ. ट्रान्सरिसिव्हरची निर्मिति होय. हा रिसिव्हर मुख्यानें एच. टी.-२ ट्रेनर विमानांत बसविण्यांत येतो. यामुळें विमानदलाची दीर्घकालापासून भासत असलेली एक गज भागली आहे.

या कारखान्यानें बेल-हेलर नांवाचा इलेक्ट्रॉनिक मेगॅफोन तयार केला आहे. त्यांतच वीज-पुरवठ्याची सोय असून पोलीस अग्निशामक पथकें, संरक्षण विभागाचीं केंद्रें, रेल्वे, डॉकयार्ड यांजकडून या यंत्रास फार मागणी असते. हवामान खात्यासाठी या कारखान्यानें १०,००० वेल्विन ट्रान्समिटरहि तयार करून दिलें. तसेंच हाय फ्रिक्वेन्सी मोबाईल ट्रान्सरिसिव्हर व व्हॉल्व्ह यांचें उत्पादन करण्यासाठीं सदर वर्षांत परदेशीय कंपन्यांशीं करार करण्यांत आले.

### नाविक दलासाठीं युद्ध-नौकांचें उत्पादन

भारतांत युद्धनौकांच्या उत्पादनासाठीहि यापूर्वीच प्रारंभ करण्यांत आलेला आहे. सुरुवातीस पहिली बोट, नांगरणीस उपयुक्त असलेलीं जहाजें व छोट्या बोटी यांच्या बांधणीचें काम हातीं घेतलेलें आहे. विशाखापट्टनम् येथील हिंदुस्थान शिपयार्ड लि. या कारखान्यांत सध्या 'ध्रुवक' ही टूरिंग बोट व 'दर्शन' ही पाहणी बोट यांची बांधणी चालू आहे. या बोटी सप्टेंबर १९६० मध्यें बांधून होतील असा अंदाज आहे. देशांतील कांहीं खासगी फर्मकडून सध्या तीन छोट्या नाविक बोटी बांधण्यांत येत आहेत.

### घरबांधणी योजना

अंबाला येथील घरबांधणी योजना सुरू करून ती अवघ्या सात महिन्यांत पुरी करून दाखवून लष्करानें आपल्या उपक्रमशीलतेची व कार्यक्षमतेची चांगलीच चुणूक दाखविली.

स्वावलंबनावर आधारलेल्या सदर योजनेंत १,१०० सामान्य सैनिक, २०० जे. सी. ओ. व १५० अधिकारी यांच्या कुटुंबांसाठी सर्व आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज असलेले १,४५० गाळे बांधण्यांत आले आहेत. एरव्ही या योजनेसाठी किमानपक्षी दोन कोटी रु. खर्च येऊन तो पूर्ण होण्यास तीन वष लागलीं असती; तेंच काम लष्करी जवानांनीं श्रमदानाच्या बळावर १ कोटी रुपयांत करून दाखविलें. या उदाहरणापासून स्फूर्ति घेऊन जम्मू व फिरोझपूर येथील अधिकारीवर्गानेहि पाटबांधणी योजना सुरू केल्या असून त्या लवकरच पूर्ण होतील असा अंदाज आहे.

—'उद्यम' डिसेंबर १९५९

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलिफोन : २७०१४

| | लाख | | लाख |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८·३० | ठेवी | रु. १०९·९४ |
| रिझर्व्ह | ,, ९·०१ | खेळतें भांडवल | ,, २३१·०० |
| कर्जें येणें | ,, ६७·५१ | तरतें भांडवल | ,, १६०·३८ |

तरत्या भांडवलाचें ठेवींशीं प्रमाण : ७६%

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें व बेळगांव.

महिला शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई - ४.

शेतीच्या मशागतीस लोखंडी बळकट नांगरच वापरा

किर्लोस्कर नांगराने नांगरट खोलवर होत असल्याने जमिनीतील तण न तण निघून पुढील मशागत करणे सुलभ जाते. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.
किर्लोस्कर
स्थापना १८८८
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)
TUSA KM4/59

## नव महाराष्ट्र

"आजच्या मुंबई राज्याचे महाराष्ट्र आणि गुजराथ हीं दोन राज्यें निर्माण करण्याचा कॉंग्रेस कार्यकारिणीनें जो निर्णय घेतला त्याचें देशांत सर्वत्र आणि विशेषतः मुंबई राज्यांतील लोकांकडून खास स्वागत झालें. एकभाषिक राज्यें निर्माण करण्याचें कार्य आतां पूर्ण होईल. अशा राज्याची कल्पना राष्ट्रीय चळवळींतून पुढें आली व ती लोकांच्या मनांत खोलवर रुजून राहिली. राष्ट्रीय नेत्यांना तीन वर्षांच्या अनुभवावरून असें पटलें कीं, अस्वाभाविक असें सध्यांचें मुंबई राज्य हें कांहीं कायमचा राष्ट्रीय तोडगा होऊं शकला नाहीं. त्यांनीं लोकमतास मान देऊन त्यांच्या भावना विचारांत घेण्याचें ठरविलें. सव्वीस मराठी भाषिक जिल्हे मिळून होणाऱ्या या नवीन मराठी राज्याचा विस्तार स्थूलमानानें १,१९,०२५ चौरस मैल असेल व लोकसंख्या ३,२१,००,००० च्यावर होईल. ह्या राज्याच्या निर्मितीमुळें अत्यंत जरूर असलेली भावनात्मक एकात्मता घडून येईल आणि भरीव विधायक कार्याच्या नव्या पर्वास सुरुवात होईल. तेव्हां आपण आपली बुद्धि, कार्यशक्ति आणि उत्साह हें सर्व आपलें राज्य शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, शिक्षण, सामाजिक सुधारणा इ. क्षेत्रांत व राष्ट्राच्या सर्वांगीण जीवनांत प्रगत आणि आदर्श ठेवण्यासाठी उपयोग करूंया. झाल्या गेल्या गोष्टी आपण विसरून सर्वजण आपापल्या परीनें महाराष्ट्राच्या विकासासाठी प्रयत्न करून असें पटवून देऊंया कीं अंतिमतः भाषिक राज्यामुळें राष्ट्रीय ऐक्य अधिकाधिक वाढत जाईल.

"उदारता, कठीण काळांत त्यागवृत्ति, विपत्तींत एकत्रित येणें आणि राष्ट्राच्या हाकेस धांवून जाणें या गोष्टींची इतिहास-परंपरा आपणांत आहे. आणि आतां नवीन राज्य स्थापन झाल्यावर आपण सर्वांनीं आपापली जबाबदारी पार पाडण्यास हिरीरीनें पुढें येऊन आपल्या निढळाच्या घामानें, श्रमानें व उत्स्फूर्त उत्साहानें आपलें राज्य सर्वोत्तम बनवूं या.

"मराठी भाषा नसलेल्या महाराष्ट्रांतील व्यापारी समाजास मला एक विनंती करावयाची आहे. त्यांच्या मनांत जर कांहीं साशंकता असेल तर मी त्यांना असें आश्वासन देऊं इच्छितों कीं, त्यांच्या शांततामय आणि प्रगतिशील व्यापार-उद्योग आदि व्यवसायांस कांहींहि धोका नाहीं. माझी खात्री आहे कीं, त्यांना अशा वातावरणाचाच प्रत्यक्षांत लवकरच अनुभव येईल आणि म्हणून मी अशी विनंती करतों कीं, आपली भाषा कोणतीहि असो; आपण सर्वांच्या हितासाठी एकत्रपणें महाराष्ट्राचा व्यापार-उद्यम वाढवूं या.

"सरहद्दींचे प्रश्न याच वेळेला निकालांत काढून टाकले म्हणजे त्यापासून पुढें कटकटी निर्माण न होऊन राज्यव्यवस्था व देशाची प्रगति यांत अडथळे येणार नाहींत. सरहद्द ठरवितांना कांहीं तत्त्वें गृहित धरून त्या आधारें सरहद्दींचे प्रश्न मिटविण्यासाठी एक स्वतंत्र कमिशन नेमण्यांत यावें. या पद्धतीनें विवाद्य विभागांचा प्रश्न एकदांचा निकालांत निघण्यास थोडा जास्त वेळ लागण्याची शक्यता आहे खरी पण त्याचबरोबर असे निर्णय तत्त्वाच्या आधारावर, खुलेपणानें आणि पूर्ण चौकशीनंतर घेतले गेल्यास त्यास सर्वांची मान्यता सहज मिळेल."

(महाराष्ट्र चेंबरच्या वार्षिक सभेंत श्री. कृ. ह. ढमढेरे ह्यांचें अध्यक्षीय भाषण.)

## नवीन राज्यांच्या राजधान्यांसाठी जमिनीचा ताबा

मुंबई राज्यासाठी १८९४ च्या जमीन ताब्यांत घेण्याबाबतच्या कायद्यामध्यें व त्यांच्या अंमलबजावणीमध्यें दुरुस्ती करण्याचें योजिलें आहे.

सध्यांच्या मुंबई राज्याची पुनर्रचना करण्यांत येणार असल्यानें नवीन राज्यांच्या राजधान्यांसाठी लागणारी जमीन योग्य त्या बाजारभावानें विकत घेण्याकरितां उपाययोजना करतां यावी म्हणून ही दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

याबाबतचें आवश्यक तें विधेयक मुंबई सरकारच्या दिनांक १० डिसेंबरच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

सध्याच्या मुंबई राज्याची पुनर्रचना करण्यांत येणार असल्यानें नवीन राज्यांच्या राजधान्यांसाठी व नवीन राज्य सरकारांच्या मुख्य ठाण्यांचा विकास करण्याच्या दृष्टीनें आवश्यक ती तरतूद करणें आवश्यक आहे असें या विधेयकामागील उद्देश व कारणें याबाबतच्या निवेदनांत सांगण्यांत आलें आहे. ह्यासाठी सक्तीनें जमिनीचा कबजा घेणें आवश्यक होईल.

मुंबई राज्याचें विभाजन करण्याबाबत फेरविचार करण्यांत येण्याची शक्यता असल्याचें वृत्त प्रथम वर्तमानपत्रांमध्यें प्रसिद्ध झाल्यानंतर नवीन राज्यांच्या राजधान्या आणि मुख्य ठाणीं यासाठी ज्या जागांची निवड करण्याची शक्यता आहे अशा विभागांतील जमिनींच्या बाजारांतील किंमती त्या विभागांतील जमिनींच्या वायदे व्यवहारामुळें वाढण्याची शक्यता आहे. तेव्हां वर निर्देशिलेल्या कारणासाठी त्या जमिनीचा अखेर ताबा घेण्यांत येईल. ती योग्य बाजारभावानें म्हणजे त्या जमिनीचा सट्टा सुरू होण्यापूर्वीच्या किंमतीला मिळवितां यावी या दृष्टीनें उपाययोजना करणें जनतेच्या दृष्टीनें हितावह आहे.

१८९४ चा जमीन ताब्यांत घेण्याबाबतचा कायदा मुंबई राज्यास लागू करण्यासाठी १९४८ च्या जमीन ताब्यांत घेण्याबाबतच्या (मुंबई दुरुस्ती) कायद्यांतील तरतुदींच्या धर्तीवर तरतुदी करण्याचें योजिलें आहे. यामुळें ज्या जमिनीचा ताबा घेण्यांत येईल त्या जमिनीची किंमत कलम ४, उपकलम (१) अनुसार नोटिफिकेशन प्रसिद्ध करण्यांत आलेली तारीख अथवा इतर योग्य ती तारीख, यांपैकी जी तारीख पूर्वीची असेल त्या तारखेपूर्वी असलेल्या किंमतीएवढी समजण्यांत येईल. या बाबतींत योग्य ती तारीख म्हणजे जुलै १९५९ ची पहिली तारीख होय, अशीहि तरतूद करण्याचें योजिलें आहे.

## पाकिस्तानी कपाशीची आयात

भारत-पाकिस्तान करारानुसार भारतानें पाकिस्तानांतून सुमारें १ कोटि रुपयांची १" व त्याखालील कपास आयात करण्यास संमति दिली आहे. म्हणजे, प्रत्येकी ४०० पौंडांच्या सुमारें २०,००० गासड्यांची आयात होईल.

## ताजमहालाचीं कारंजीं पुनः सुरू होणार

ताजमहालाचीं कारंजीं गेलीं तीस वर्षें बंद पडलीं आहेत, तीं आतां पुनः सुरू करण्यांत येणार आहेत. ताजमहालाच्या सौंदर्यांत व आकर्षणांत भर घालण्याच्या कार्यक्रमाचा तो एक भाग आहे. ताजमहालाच्या भोंवतीं हिरवळ लावण्यांत येत आहे; येण्या-जाण्याचे रस्तेहि सुधारले जातील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.